**उदय सामंत**

सत्यमेव जयते

# शुभ संदेश

**मंत्री**
**उद्योग**
**महाराष्ट्र राज्य**

19 APR 2023

सामाजिक बांधिलकी जपत आपण करीत असलेल्या कार्याबद्दल सर्वप्रथम आपले मन:पूर्वक अभिनंदन!

समकालीन काळामध्ये सामाजिक संस्थांची सर्वच क्षेत्रातील कामगिरी निश्चितपणे कौतुकास्पद असून आपण करीत असलेल्या कार्याचा आम्हाला अभिमान आहे. 'वात्सल्य सामाजिक संस्था' विविध सामाजिक उपक्रमांमध्ये अग्रेसर असल्याचे समजून आनंद वाटला. गो-संवर्धन, आरोग्य, एकल भगिनी, वृक्ष लागवड व संवर्धन, अनाथ मुलांसाठी शैक्षणिक कार्य अशा विविध क्षेत्रात संस्था कार्यरत आहे हे निश्चितच कौतुकास्पद आहे. विशेषतः कोरोनाच्या जागतिक महामारीत आपण केलेले काम अनेकांच्या जगण्याचा आधार ठरले आहे. एकल महिलांचे प्रश्न, जगण्यासाठी करावी लागणारी धडपड, स्वाभिमानी जीवन जगण्याचे मार्ग, अशा मूलभूत प्रश्नावर तुळजापूर आणि परिसरातील महिलांमध्ये संस्थेचे कार्य आहे. या भगिनींना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी शिलाई मशीन, कुक्कुटपालन, गांडूळ खत प्रकल्प, शेळीपालन अशा विविध गोष्टींची मदत केली जाते. या कामांमुळे संस्था निराधारांसाठीचा सक्षम आधार ठरली आहे. संस्थेचे सामाजिक क्षेत्रातील विधायक कार्य यापुढेही असेच सक्रियपणे व अविरतपणे सुरू राहील, असा विश्वास व्यक्त करतो.

संस्थेच्या भविष्यकालीन वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!

**( उदय सामंत )**

प्रति,
वात्सल्य सामजिक संस्था,
नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. धाराशिव